**Department of Geography**
**Event/Activity details**
**2021-22**

| | |
|---|---|
| Event Tile | “Majhi Vasundhara Majhi Jababdari” |
| Organized By | Department of Geography |
| Date Of Organization | 03 January 2022 |
| Funding Agency | Sangola College, Sangola |
| Collaboration/MOU | ---- |
| Description | IQAC, Geography Department & Dept. of Environment of this college organized awareness session for students under a celebration **of “Majhi Vasundhara Majhi Jababdari”**. In this program, Dr. R. S. Suryavanshi made the students aware of the importance of nature. |
| Photographs | |

## सांगोला महाविद्यालयात माझी वसुंधरा: माझी जबाबदारी या विषयावर व्याख्यान संपन्न



सांगोला (प्रतिनिधी):- सांगोला तालुका उच्च शिक्षण मंडळ संचलित, सांगोला महाविद्यालयात सोमवार दि.०३ जानेवारी २०२२ रोजी माझी वसुंधरा: माझी जबाबदारी या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान संपन्न झाले. या कार्यक्रमासाठी विज्ञान महाविद्यालय, सांगोला येथील वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ.आर.एस.सुर्यवंशी उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविदयालयाचे प्राचार्य डॉ.मधुसूदन बचुटे यांनी भूषविले.

महाविदयालयातील भूगोल, पर्यावरणशास्त्र विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विदयमाने माझी वसुंधरा: माझी जाबाबदारी या विषयावर व्याख्यानाचे आयोजन केले होते. या

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ.आर.एस.सुर्यवंशी यांनी वसुंधरेचे महत्व सांगताना भूमी, जल, वायू, अग्नी व आकाश या पंचत्वापासून आपणास जीवन प्राप्त झाले आहे असे प्रतिपादन केले. त्यामुळे त्यांचे रक्षण करणे आपणा सर्वांची जबाबदारी आहे. मानवाचा निसर्गातील हस्तक्षेप वाढला असून मानवाने अति हव्यासापोटी सौंदर्याने बहरलेला निसर्गाचे अतोनात नुकसान केले आहे.

प्राचार्य डॉ.मधुसूदन बचुटे म्हणाले की, आपल्याकडून कोणतेही पर्यावरणीय प्रदुषण होणार नाही. प्रत्येकाने एक तरी वृक्षाची लागवड करावी व त्याचे संवर्धन करावे. वसुंधरेचे कोणतेही नुकसान होणार नाही, याची प्रत्येकाने जबाबदारी घ्यावी.

प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा.एस.जी.पाटील यांनी केले. पाहुण्यांची ओळख प्रा.डॉ.टी.आर माने यांनी करून दिली. तर आभार प्रा.एस.एस.कांबळे यांनी मानले. योवळी प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विदयार्थी उपस्थित होते.